Sr. No. 103, Parvati, Pune - 411 009.
Tel.: 020-24218901/8959 Tele Fax : 020-24213929
**Web.**: http://www.abmspcoerpune.org **Email :** abmspcoe@yahoo.com • office@abmspcoerpune.org


Accredited by NAAC
Approved by AICTE & Govt. of Maharashtra, Affiliated to Savitribai Phule Pune University
DTE CODE :- EN 6794, AISHE CODE :- C-41484
Savitribai Phule Pune University Identification No. PU/PN/Engg. / 441/2012
ISO 9001 2015 CERTIFIED


# Criteria 5

## 5.3.1

## Number of awards/medals for outstanding performance in sports/ cultural activities at University / state/ national / international level (award for a team event should be counted as one) during the last five years

TODAY पुणे शहर
सकाळ पुणे, शनिवार २५ फेब्रुवारी २०१७ ५

# 'स्पार्कटेक २०१७'ला विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद

**पुणे, ता. २४ :** 'सकाळ'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) आणि अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्चतर्फे 'स्पार्कटेक २०१७' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम झाला.

यामध्ये विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी तांत्रिक आणि इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन आपले कौशल्य अजमावले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड व प्राचार्य सुनील ठाकरे यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयातील प्रत्येक विभागातर्फे एकूण २१ उपक्रम घेण्यात आले. त्यापैकी तांत्रिक आणि नॉन टेक्निकल उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'हाय हाय' या पथनाट्याचे सादरीकरण केले. या पथनाट्यांमध्ये 'तृतीयपंथीयांच्या समस्या आणि सद्यःस्थिती' हा विषय हाताळण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन प्रा. सायली कोकणे, प्रा. स्नेहा साळवेकर, प्रा. संदीप राऊत, प्रा. अनिल लोहार, प्रा कुणाल ठाणेकर यांनी केले होते. विद्यार्थी प्रतिनिधी वृषभ राखडे याने मनोगत व्यक्त केले, तर शिवानी जाधव हिने आभार मानले.



**पर्वती : 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'तर्फे आयोजित 'स्पार्कटेक २०१७' कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसह मान्यवर.**

**Spartech Event 15th February 2017**

सकाळ प्रतिबिंब पुणे, गुरुवार, ९ नोव्हेंबर २०१७ ३

# 'जलतरण'मधील यशाबद्दल प्रांजल ताथवडे हिचा सत्कार

**पुणे** : पर्वती येथील अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च महाविद्यालयाच्या प्रांजल ताथवडे या विद्यार्थिनीने नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. याबद्दल तिचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

चंडीगड येथे झालेल्या या स्पर्धेत तिने ४ बाय १०० मीटर मिडले रिले स्पर्धेत ४ मी.५७.१८ सेकंद वेळ नोंदवून हे यश मिळवले. तसेच ४ बाय २०० मीटर फ्रीस्टाइल रिले या प्रकारामध्ये १० मी. ९. २९ सेकंद वेळ घेऊन रौप्य व ४ बाय १०० मीटर फ्रीस्टाईल रिलेमध्ये ब्राँझ पदक पटकाविले. या विद्यार्थिनीच्या यशाचे संस्थेचे सरचिटणीस प्रमिला गायकवाड आणि प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे व सर्व विभाग प्रमुखांनी कौतुक केले आहे. प्रांजलला तिचे वडील मिलिंद ताथवडे व क्रीडा संचालक प्रा. नवनाथ सरोदे यांनी मार्गदर्शन लाभले.



**पर्वती : जलतरण स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविल्याबद्दल प्रांजल ताथवडे हिचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर व प्राध्यापक.**

Anantrao Pawar College of Engineering & Research LIBRARY Pune

**Pranjal Tathwade Felicitated By College Principal**

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ▪ सोमवार, ३० ऑक्टोबर २०१७

Pawar College of Engineering LIBRARY Pune

# जलतरणात युगा बिरनाळेचे सुवर्णयश

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या युगा बिरनाळे हिने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत सुवर्ण, रौप्य आणि ब्रॉँझपदक पटकावले.

चंदीगडमध्ये ही स्पर्धा सुरू आहे. मुलींच्या ५० मी. बटरफ्लायमध्ये युगा बिरनाळेने सुवर्णयश मिळविले. युगाने २९.७३ सेकंद वेळ नोंदविली. त्यापाठोपाठ जैन विद्यापीठाच्या दामिनी गौडाने रौप्य आणि दिल्ली विद्यापीठाच्या शिवानी कटारियाने ब्रॉँझपदक मिळविले. पुण्याची आकांक्षा बुचडे (३०.९० से.) चौथ्या क्रमांकावर राहिली. स्पर्धेतील ५० मी. बॅकस्ट्रोकमध्ये युगाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. युगाने ३२.१७ सेकंद वेळ नोंदविली. आकांक्षाने ब्रॉँझपदक मिळविले. जैन विद्यापीठाच्या मीनाक्षीने ३१.६० सेकंद वेळेसह सुवर्णपदक पटकावले. तसेच, २०० मी. बॅकस्ट्रोकमध्ये युगाला ब्रॉँझपदकावर समाधान मानावे लागले. युगाने २ मिनिटे ३३.५५ सेकंद वेळ नोंदविली. जैन विद्यापीठाच्या व्ही. के. आर. मीनाक्षीने २ मि. २९.३२ सेकंद वेळ नोंदवीत सुवर्ण, दामिनीने (२ मि. ३३.५१ मि.) रौप्यपदक मिळविले.

दरम्यान, मुलांच्या ५० मी. बॅकस्ट्रोकमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हर्षल वखारियाला ब्रॉँझपदकावर समाधान मानावे लागले. वखारियाने २७.६६ सेकंद वेळ नोंदविली. श्वेजल मानकर (२७.७४ से.) चौथ्या स्थानी राहिला. दिल्ली विद्यापाठीच्या सिद्धान्त सेजवळने २७.०० सेकंद वेळ नोंदवीत सुवर्ण पटकावले.




## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सरशी

मुलींच्या ४ बाय १०० मी. मिडलेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाने बाजी मारली. या संघाने ४ मिनिटे व ५७.१८ सेकंद वेळ नोंदविली. या संघात आकांक्षा बुचडे, युगा बिरनाळे, प्रांजल ताथवडे, रविजा सिंघल यांचा समावेश आहे. विश्वेश्वरय्या टेक्नॉलॉजी विद्यापीठाने दुसरा आणि मुंबई विद्यापीठाने तिसरा क्रमांक मिळविला.

**Pranjal Tathwade (30 October 2017)**

AKHIL BHARATIYA MARATHA SHIKSHAN PARISHAD'S
**ANANTRAO PAWAR COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH**
Sr. No. 103, Parvati, Pune - 411 009.
Tel.: 020-24218901/8959 Tele Fax : 020-24213929
**Web.**: http://www.abmspcoerpune.org **Email :** abmspcoe@yahoo.com • office@abmspcoerpune.org
APCOE&R PUNE

Accredited by NAAC NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL
Approved by AICTE & Govt. of Maharashtra, Affiliated to Savitribai Phule Pune University
DTE CODE :- EN 6794, AISHE CODE :- C-41484
Savitribai Phule Pune University Identification No. PU/PN/Engg. / 441/2012
ISO 9001 2015 CERTIFIED

**लोकसत्ता [पुणे]**
शनिवार, ४ नोव्हेंबर २०१७

Anantrao Pawar College of Engineering & Research LIBRARY * Pune *

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत प्रांजल ताथवडेला सुवर्ण पदक



**अखिल भारतीय** मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्चची विद्यार्थिनी प्रांजल मिलिंद ताथवडे हिने चंदीगड येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकाविले. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावर ही जलतरण स्पर्धा घेण्यात आली होती. ४ बाय १०० मीटर मिडले रिले स्पर्धेत ४ मिनिटे ५७.१८ सेकंदांची वेळ नोंदवत प्रांजलने सुवर्णपदकावर नाव कोरले. ४ बाय २०० माटर फ्रीस्टाईल रिले या प्रकारात १० मिनिटे ९.२७ सेकंद वेळ नोंदवून रौप्य, तर ४ बाय १०० मीटर फ्रीस्टाईल रिले मध्ये कांस्यपदकाची कमाई केली.

प्रांजल ताथवडे हिच्या या यशाचे संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे आणि सर्व विभाग प्रमुखांनी अभिनंदन केले आहे. या स्पर्धेसाठी प्रांजलला तिचे वडील मिलिंद ताथवडे आणि महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. नवनाथ सरोदे यांनी मार्गदर्शन केले.

**Pranjal Tathwade (4 November 2017)**

AKHIL BHARATIYA MARATHA SHIKSHAN PARISHAD'S
ANANTRAO PAWAR COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
Sr. No. 103, Parvati, Pune - 411 009.
Tel.: 020-24218901/8959 Tele Fax : 020-24213929
**Web.**: http://www.abmspcoerpune.org **Email :** abmspcoe@yahoo.com • office@abmspcoerpune.org
APCOE&R PUNE

Accredited by NAAC NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL
Approved by AICTE & Govt. of Maharashtra, Affiliated to Savitribai Phule Pune University
DTE CODE :- EN 6794, AISHE CODE :- C-41484
Savitribai Phule Pune University Identification No. PU/PN/Engg. / 441/2012
ISO 9001 2015 CERTIFIED

सकाळ

Anantrao Pawar College of Engineering & Research LIBRARY Pune

# प्रांजल ताथवडे हिची जलतरणसाठी निवड


प्रांजल ताथवडे

**सहकारनगर :** अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, पर्वती-पुणे महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रांजल ताथवडे हिची बंगळूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धा विश्वेश्वरैया टेक्नोलॉजिकल विद्यापीठ, बेळगाव येथे होणार आहे. जलतरण या क्रीडा प्रकारात तिची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू म्हणून निवड झाली. याबद्दल संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल ठाकरे यांनी तिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तिला क्रीडा संचालक प्रा. नवनाथ सरोदे यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

Pune, SataraRoad
05/11/2018 Page No. 1

**Pranjal Tathwade (5 November 2018)**

AKHIL BHARATIYA MARATHA SHIKSHAN PARISHAD'S

ANANTRAO PAWAR COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH

Sr. No. 103, Parvati, Pune - 411 009.

Tel.: 020-24218901/8959 Tele Fax : 020-24213929

**Web.**: http://www.abmspcoerpune.org **Email :** abmspcoe@yahoo.com • office@abmspcoerpune.org

APCOE&R PUNE



Accredited by NAAC NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

Approved by AICTE & Govt. of Maharashtra, Affiliated to Savitribai Phule Pune University

DTE CODE :- EN 6794, AISHE CODE :- C-41484

Savitribai Phule Pune University Identification No. PU/PN/Engg. / 441/2012

ISO 9001 2015 CERTIFIED



लोकमत

बुधवार 23 जानेवारी 2019


LIBRARY

# जलतरण स्पर्धेत मिहीर, नचिकेत, रुपल, नील, सिमरन, साहिल, प्रांजल यांना सुवर्णपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**लोणी काळभोर :** एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, राजबाग, लोणी काळभोर येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन तिसऱ्या विश्वनाथ स्पोर्ट्स मीट - २०१९ मध्ये जलतरण स्पर्धेत गरवारे कॉलेज ५० मीटर फ्रीस्टाईल पुरुष प्रकारात मिहीर आंब्रे, ५० मीटर बटरफ्लाय महिला प्रकारात रुपल बुजाडे, ५० मीटर फ्रीस्टाईल पुरुष प्रकारात एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या नचिकेत बुलबुक, ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात एसपी कॉलेजचा नील गुंडे, ५० मीटर बॅकस्ट्रोक महिला प्रकारात एमआयटी डब्ल्यूपीयूची सिमरन वैद्य, ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक पी. जोग कॉलेजचा साहिल पवार आणि ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक महिला एपीसीओईची प्रांजल मिलिंद यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करीत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

एमआयटी - एडीटी विद्यापीठातर्फे आयोजित राज्यस्तरीय तिसऱ्या आंतरमहाविद्यालयीन विश्वनाथ स्पोर्ट्स मीट - २०१९ स्पर्धेच्या पहिल्या दिवशीच जलतरणाच्या सामन्यात ५० मीटर बटरफ्लाय पुरुष स्पर्धेत गरवारे कॉलेजच्या मिहीर आंब्रे यांनी २६.७५ सेकंदामध्ये पूर्ण करीत सुवर्णपदक जिंकले. एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या नचिकेत बुलबुक यांनी २८.१९ सेकंद वेळ नोंदवत रौप्य, तर फ्रीस्टाईल प्रकारात २६.३२ सेकंद नोंदवत सुवर्णपदक जिंकले. ५० मीटर बटरफ्लाय, ५० मीटर फ्रीस्टाईल महिला प्रकारात एमआयटी डब्ल्यूपीयूची रुपल बुजाडे हिने ३७.३५ सेकंद वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले. आर्म फोर्स मेडिकल कॉलेजची स्नेहल बाडे हिने ४४.९८ सेकंद वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले. ५० मीटर फ्रीस्टाईल पी. जोग कॉलेजचा साहिल पवार याने २६.५६ सेकंद नोंदवत रौप्यपदक जिंकले.

**1** कबड्डी सामना एमआयटी एसओई आणि एस. एम. जोशी कॉलेज हडपसर यांच्यात खेळला गेला. सामन्याच्या पहिल्या सत्रामध्ये दोन्ही संघांनी सामना ठेवला केला. दुसऱ्या सत्रामध्ये एस. एम. जोशी संघाच्या प्रीतम सरवदे यांनी सुपर रेड करीत एमआयटी एसओई संघावर लोण चढवले. एमआयटी एसओई संघाचे प्रसाद नवले आणि प्रदीप जाधव यांनी संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र सूरज लष्कर याने सुपर रेड करीत संघाला यांत्रिकी आघाडी मिळवून दिली. जोशी महाविद्यालयाच्या डिफेन्सनेसुद्धा आपली ताकद दाखवत संघाला ४४-२१ असा फरकाने जिंकून दिले. कबड्डीच्या दुसऱ्या सामन्यात गरवारे कॉलेज यांनी कोल्हापूर येथील डॉ. जे. जे. मॅगदम संघाला हार पत्करण्यास भाग पाडले.

**2** फुटबॉलचा सामना एमआयटीआयटी लोहगाव आणि एमआयटी एएससी आळंदी यांच्यात झाला. एमआयटी एएससी आळंदीचा स्ट्रायकर ऋतुराज पाटील यांनी दुसऱ्या सत्रात गोल करीत संघाला १-० असा विजय मिळवून दिला. महिलांच्या चौथ्या सामन्यात एमआयटी सीओई आणि व्हीआयटी यांच्यात पेनल्टीवर एमआयटी सीईओ संघाने विजय मिळवला.

**3** टेबल टेनिस स्पर्धेच्या महिलांचा पहिला सामना एमआयटी सीएफटी आणि एमआयटी पीनेट यांच्यात झाला. तिसऱ्या सेटमध्ये सीएफटीने सहा गुण जिंकत सामना जिंकला. पुरुषांचा पहिला सामना एमआयटी आळंदी आणि एमआयटी आयएसबीजे यांच्यात झाला. यात आळंदी यांनी हा सामना जिंकला. बास्केटबॉलचा सामना सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि एमआयटी आयओडी यांच्यात झाला. यामध्ये सिंहगड कॉलेज यांनी एकतर्फी सामना जिंकत ४४-१० आयओडी संघावर मात केली.





पुणे : ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक स्पर्धेत सुवर्णपदकविजेती प्रांजल मिलिंद.

## सविस्तर निकाल

- ५० मीटर फ्रीस्टाईल रिले पुरुष - एमआयटी पीनेट - सुवर्ण
- ५० मीटर फ्रीस्टाईल रिले महिला - सीईओपी, पुणे - सुवर्ण
- एमआयटीआयओडी - रौप्य
- ५० मीटर बॅकस्ट्रोक पुरुष - एसपी कॉलेजचा नील गुंडे - सुवर्ण
- एमआयटी एसओएचा पार्थ गोरे - रौप्य
- ५० मीटर बॅकस्ट्रोक महिला - एमआयटी-डब्ल्यूपीयूची सिमरन वैद्य
- एमआयटी-एओईची - गायत्री वाडेकर - रौप्य
- ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक पुरुष - पी. जोग कॉलेजचा साहिल पवार - सुवर्ण
- व्हीआयआयटीचा प्रतित लोनारकर - रौप्य
- ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक महिला : अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (एपीसीईओ) ची प्रांजल मिलिंद एमआयटी-आयओडीची तनिषा दळवी - रौप्य

लोकमत

जनसंपर्क विभाग :- एमआयटी - एडीटी विद्यापीठ

**Pranjal Tathwade (23 January 2019)**

लोकमत पुणे, गुरुवार, दि. ७ फेब्रुवारी २०१९ ६


## प्रांजल ताथवडेला जलतरणमध्ये सुवर्ण


Anantrao Pawar College of Engineering & Research LIBRARY Pune


लोकमत न्यूज नेटवर्क



सहकारनगर : अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रीसर्च पर्वती, पुणे महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रांजल ताथवडे हिने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन विश्वनाथ स्पोर्ट मीट-२०१९ स्पर्धेत जलतरण या क्रीडा प्रकारात दोन सुवर्णपदके पटकावली. महाविद्यालयाला जलतरणासाठी द्वितीय क्रमांकाचा करंडक मिळाला. ही स्पर्धा एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ राजबाग, लोणी काळभोर, पुणे येथे पार पडली. जलतरण या क्रीडाप्रकारात प्रांजलने १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक महिला व ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक महिला या दोन स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळविले. प्रांजलच्या या सुवर्णयशाबद्दल सरचिटणीस प्रमिला गायकवाड व प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांनी अभिनंदन केले. प्रांजलला प्रा. नवनाथ सरोदे व वडील मिलिंद ताथवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**Pranjal Tathwade (7 February 2019)**

सकाळ TODAY

पुणे, बुधवार, २५ सप्टेंबर २०१९/७



LIBRARY


## जलतरण स्पर्धेमध्ये प्रांजलला सुवर्णपदक




प्रांजल ताथवडे

**सहकारनगर, ता. २४ :** पर्वती येथील अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड रिसर्च महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रांजल ताथवडे हिने राज्यस्तरीय आंतर-महाविद्यालयीन विश्वनाथ स्पोर्ट मिट-२०१९ स्पर्धेमध्ये जलतरण या क्रीडा प्रकारात दोन सुवर्णपदके पटकाविली. त्याचबरोबर महाविद्यालयास जलतरणासाठी द्वितीय क्रमांकाचा करंडक मिळवला. ही स्पर्धा एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ लोणी काळभोर येथे पार पडली. प्रांजलच्या यशाबद्दल संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांनी अभिनंदन केले. महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. नवनाथ सरोदे व प्रांजलचे वडील मिलिंद ताथवडे यांनी मार्गदर्शन केले.

**Pranjal Tathwade (25 September 2019)**

AKHIL BHARATIYA MARATHA SHIKSHAN PARISHAD'S
ANANTRAO PAWAR COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
Sr. No. 103, Parvati, Pune - 411 009.
Tel.: 020-24218901/8959 Tele Fax : 020-24213929
**Web.**: http://www.abmspcoerpune.org **Email :** abmspcoe@yahoo.com • office@abmspcoerpune.org
APCOE&R PUNE

Accredited by NAAC NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL
Approved by AICTE & Govt. of Maharashtra, Affiliated to Savitribai Phule Pune University
DTE CODE :- EN 6794, AISHE CODE :- C-41484
Savitribai Phule Pune University Identification No. PU/PN/Engg. / 441/2012
ISO 9001 2015 CERTIFIED



Anantrao Pawar College of Engineering & Research LIBRARY Pune

सामना

१ पुणे शहर

पुणे, बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२०

## ■ स्पार्कटेक तांत्रिक महोत्सवाचे आयोजन

पुणे : अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड रिसर्च पर्वती पुणे महाविद्यालयातील आयएसटीई विद्यार्थी विभागाच्या वतीने 'स्पार्कटेक २०२०' या तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाचे उद्घाटन धैर्यशील वंडेकर, मारोतराव साळुंखे, प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

**Spartech Event (19th February 2020)**

Anantrao Pawar College of Engineering & Research LIBRARY Pune

प्रभात पुणे, बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२०

## ‘क्लीन्जिंग थेरपी अँड फिजिकल फिटनेस’ विषयावर ऑनलाइन कार्यशाळा

**पुणे-** अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्चतर्फे ‘क्लीन्जिंग थेरपी अँड फिजिकल फिटनेस’ या विषयावर ऑनलाइन कार्यशाळा घेण्यात आली. महाविद्यालयाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने करोनाच्या काळामध्ये सर्वांनी आपले आरोग्य सांभाळून आपली प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्राचार्य डॉ. उदय नवलेकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी क्लीन्जिंग थेरपी म्हणजे काय? ही थेरपी शरीराच्या कोणकोणत्या अवयवावर परिणामकारक आहे, या विषयी मार्गदर्शन केले. यात लिव्हर क्लीन्जिंग, किडनी क्लीन्जिंग, सीडीटी क्लीन्जिंग, माऊथ क्लीन्जिंग व जॉइन्ट क्लीन्जिंग या घटकावर भर देऊन ते करण्याची पद्धत वापरण्यात येणारे साहित्य व त्याचे प्रमाण, ही थेरपी करताना घ्यावयाची काळजी आणि ही थेरपी केल्यानंतर होणारे फायदे याविषयी सखोल माहिती उपस्थितांना दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरेंसह सर्वांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे नियोजन क्रीडा संचालक प्रा. नवनाथ सरोदे यांनी केले. विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी प्रा.गणेश कोंढाळकर यांनी आभार मानले.

**Cleasing therapy and physical fitness (19th August 2020)**

पुण्याचं पहिलं स्वतंत्र न्यूज पोर्टल

मा य म रा ठी

www.mymarathi.net

Anantrao Pawar College of Engineering & Research LIBRARY



## मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

Posted By: SHARAD LONKAR on: February 27, 2021
In: Feature Slider, Local Pune
Print Email

अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च पर्वती, पुणे महावि

मराठी भाषेचा विकास व प्रसाराला चालना मिळावी म्हणून विद्यार्थी विव

सदर कार्यक्रमासाठी संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड, प्राचार्य डॉ.सुनिल ठाकरे, विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी प्रा.गणेश कोंढाळकर, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन प्रा.गणेश कोंढाळकर व प्रा.तानाजी माळी यांनी केले. हा सोहळा कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सोशल डीस्टसिंगचे नियम पळून पार पडला.

Share 0 Tweet Share Share

**Marathi Bhasha Day (27th February 2021)**